ARTHA Poona 4.

उद्योगधंदे, बँकिंग, अर्थशास्त्र, व्यापार, सहकार, इत्यादि विषयांस वाहिलेलें एकमेव मराठी साप्ताहिक
स्थापना : १९३५

# अर्थ

*" अर्थ एव प्रधानः" इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति ।*
*—कौटिलीय अर्थशास्त्र*

प्रत्येक बुधवारीं प्रसिद्ध होतें.
वर्गणीचे दर :
वार्षिक : ६ रु.
सहामाही : ३ रु.
किरकोळ : १२ नये पैसे
दुर्गाधिवास, पुणें ४.

LICENCED TO POST WITHOUT PREPAYMENT
Reg. No. B. 3434. Licence No. 53.

वर्ष २३ | पुणें, बुधवार तारीख ३१ जुलै, १९५७ | अंक ३१

## विविध माहिती

**३० कोटी रुपयांची यंत्रसामुग्री**—पश्चिम जर्मनी, ब्रिटन, इटली आणि जपान ह्या देशांतील कारखान्यांकडून ३० कोटी रुपये किंमतीची यंत्रसामुग्री आयात करण्याची व्यवस्था भारतामधील आयात व्यापाऱ्यांनीं केली आहे. ह्या भांडवली मालाची किंमत तावडतोब न घेतां उशिरा घेण्याचें कारखान्यांनीं कबूल केलें आहे. ह्या आयातीशीं सरकारचा कांहीं संबंध नाहीं.

**हिंदी चित्रपटाला बक्षीस**—झेकोस्लोव्हाकिआंत भरविण्यांत आलेल्या आंतरराष्ट्रीय चित्रपटमहोत्सवांत 'जागते रहो' ह्या भारतीय चित्रपटाला बक्षीस देण्यांत आलें. ह्या महोत्सवांत ४२ देशांनीं भाग घेतला होता. सर्व देशांकडून आलेल्या स्पर्धेच्या चित्रपटांची संख्या ७० होती. बहुतेक चित्रपट बिगर-कम्युनिस्ट देशांकडून आलेले होते.

**कच्छचें रण सुपीक करणार**—पंतप्रधान नेहरू हॉलंडला गेले असतांना हॉलंडच्या सरकारनें कच्छचें छोटें रण समुद्राच्या पाण्यापासून वांचविण्याच्या कामीं तांत्रिक व आर्थिक मदत देऊं केली. रणाचा विस्तार १४,००० चौरस मैल असून त्याचें समुद्रापासून रक्षण झाल्यास तेथें गहूं व तांदूळ पिकूं शकेल, असें म्हणतात.

**सोळा साखर कारखाने बंद**— भारतांत साखरेची निर्मिती करणारे सुमारें १२० कारखाने आहेत. त्यांपैकी १६ कारखाने बंद पडले असल्याची माहिती लोकसभेंत सांगण्यांत आली. दहा कारखान्यांची यंत्रसामुग्री अतिशय जुनी झाल्यानें ते बंद आहेत. बाकीचे सहा पैशाच्या अडचणी, मागीदारांमधील भांडणें, इत्यादि कारणांनीं बंद आहेत. ह्यांपैकीं किती कारखान्यांना पुनर्घटनेची परवानगी देण्यांत आली होती, तें समजलेलें नाहीं.

**पोटगीपेक्षा तुरुंग बरा**— अहमदाबादमधील एका कामगारानें आपल्या पत्नीपासून घटस्फोट मिळविण्याबद्दल काम चालविलें होतें. दरम्यानच्या विभक्त रहाण्याच्या काळांत त्यानें पत्नीला ९ महिन्यांची पोटगी म्हणून २७० रुपये द्यावे असा हुकूम कोर्टानें दिला. पण इतकी रक्कम देणें आपल्याला परवडणार नाहीं असें म्हणून त्यानें ९ महिन्यांची साधी कैद पत्करली.

**पाकिस्तानांत तेलाचा कारखाना**— पाकिस्तानमध्यें अशुद्ध तेल शुद्ध करण्याचा एक कारखाना काढण्याचें चार परदेशीय कंपन्यांनीं ठरविलें आहे. संकल्पित कारखान्यासाठीं चार कंपन्या मिळून एक नवी कंपनीच स्थापन करणार आहेत. कंपनी पाकिस्तानांत रजिस्टर करण्यांत येईल आणि तींत पाकिस्तानचें सरकार बरेंच भांडवल घालेल.

**स्वातंत्र्ययुद्धाची सांवत्सरी**—१९५७ च्या स्वातंत्र्ययुद्धाची सांवत्सरी साजरी करण्यासाठी मध्यप्रदेश सरकारनें कांहीं वाङ्मयीन स्पर्धा जाहीर केल्या आहेत. ह्या स्वातंत्र्य युद्धाशीं संबंध असलेल्या गोष्टींवर रचलेल्या कविता, एकांकी नाटक आणि मोठें नाटक ह्यांची स्पर्धा ठेवण्यांत आली आहे.

**सुरतमधील रेशमाच्या गिरण्या**— सुरत शहरांतील १३ रेशमाच्या छोट्या कारखान्यांनीं काम बंद ठेवण्याबद्दलच्या नोटिसा लावल्या आहेत. बाजारांत मालाला मागणी नसल्याचें कारण दाखविण्यांत आलें आहे. गिरण्या बंद करण्यांत आल्या तर सुमारें ४०० कामगार रोजगाराला मुकतील.

**हें कसें होणार**—अमेरिकेच्या सिनेट सभागृहाच्या एका सभासदानें सिगारेटच्या पाकिटाविषयीं एक बिल मांडलें आहे. बिल मंजूर झाल्यास, सिगारेटच्या पाकिटावर "ह्या वस्तूंचा नेहमीं वापर केल्यास कॅन्सर, फुप्फुसाचे अगर हृदयाचे विकार होण्याचा संभव आहे." असा धोक्याचा इषारा छापावा लागेल.

**विद्यार्थ्यांची गैरसोय होणार नाहीं**—भारतामधील जे विद्यार्थी शिक्षणासाठीं ह्यापूर्वींच परदेशांत गेले आहेत, त्यांच्या खर्चासाठीं लागणाऱ्या परदेशीय हुंडणावळीची सोय भारत सरकार जरूर करील अशी माहिती अर्थमंत्री श्री. टी. टी. कृष्णम्माचारी ह्यांनीं लोकसभेंत एका प्रश्नाला उत्तर देतांना सांगितली.

**वैद्यकीय उपकरणांची आयात**—अर्थमंत्री श्री. कृष्णम्माचारी ह्यांनीं कर्नूल येथील मेडिकल कॉलेजचें उद्घाटन करतांना असें आश्वासन दिलें कीं, वैद्यकीय संस्थांना लागणारी सामुग्री आयात करण्याच्या कामीं विदेशी चलनाच्या टंचाईची अडचण सरकार भासूं देणार नाहीं. ह्या साहित्याच्या आयातीला आयातीच्या कार्यक्रमांत बराच वरचा अनुक्रम देण्यांत आला आहे.

**भारतामधील सर्वांत मोठा कांचकारखाना**—हजारीबाग येथें भारतामधील सर्वांत मोठ्या कांचकारखान्याचें औपचारिक उद्घाटन जपानचे भारतामधील वकील मि. योशिझावा ह्यांनीं केलें. भारत व जपान ह्यांच्यामधील तांत्रिक सहकार्याचें हा कारखाना म्हणजे लक्षांत भरण्यासारखें उदाहरण आहे, असे उद्गार जपानच्या वकिलांनीं ह्या प्रसंगीं काढले.

**झोपेचें नवें औषध**—तीन मिनिटांच्या काळांत शांत झोंप आणूं शकणारें नवें औषध एका फ्रेंच डॉक्टरनें शोधून काढलें आहे. ह्या औषधानें शरीरांतर्गत महत्त्वाच्या इंद्रियांवर विपरीत परिणाम होत नसल्यानें त्याचा उपयोग बाळंतपण अवघड असणाऱ्या स्त्रियांना विशेष होईल, असा अंदाज करण्यांत आला आहे.

## रिझर्व्ह बँकेच्या गव्हर्नरांची पुणें सें. को. बँकेस भेट

रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर श्री. एच. व्ही. आर. अयंगार यांनीं दि. २५ रोजीं दुपारीं चार वाजतां येथील पुणें सेंट्रल को-ऑप. बँकेस अनौपचारिक भेट दिली. त्यावेळीं बँकेचे माजी अध्यक्ष व इतर सन्मान्य निमंत्रित उपस्थित होते. त्यांच्यासमवेत श्री. अयंगार यांनीं सुमारें सव्वातास जिव्हाळ्याच्या आर्थिक प्रश्नांवर चर्चा केली.

बँकेतर्फे गव्हर्नरांचें स्वागत करतांना, बँकेचे अध्यक्ष श्री. पांढव यांनीं एक छोटें निवेदन केलें. रिझर्व्ह बँकेनें 'बँक-रेट' मध्यें केलेली वाढ आणि पोस्ट व बड्या बँकांनीं ठेवींच्या दरांत केलेली वाढ, यामुळें सहकारी बँकांवरील भार वाढणार आहे, अशी काळजी त्यांनीं व्यक्त केली. देशांतील वाढत्या आर्थिक उलाढालीमुळें ही परिस्थिति अटळ आहे आणि तिची झळ सर्वांना सारखीच लागणार आहे, असे उद्‌गार श्री. अयंगार यांनीं आपल्या उत्तरांत काढले. मात्र, सहकारी बँकांना शक्य तितकी मदत करण्याचें रिझर्व्ह बँकेचें धोरण यापुढेंहि तसेंच चालू राहील, असें आश्वासन शेवटीं त्यांनीं दिलें.

### बँकेच्या खेड शाखेस भेट

रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर श्री. एच. व्ही. आर. अयंगार यांनीं पुणें सेंट्रल को-ऑपरेटिव्ह बँकेच्या खेड येथील शाखेस दि. २६ रोजीं भेट दिली. बँकेचे अध्यक्ष श्री. पांढव, मुंबई राज्यांतील सहकारी सोसायट्यांचे रजिस्ट्रार डॉ. शेख व प्रा. द. गो. कर्वे हेहि त्यांचे समवेत होते. पुण्यास परतताना त्यांनीं चाकण वि. का. सहकारी सोसायटीस भेट दिली.

श्री. अयंगार यांनीं शेतकऱ्यांच्या प्रतिनिधींशी समक्ष चर्चा केली, आणि बटाटा कर्ज-योजना त्यांचेकडून समजावून घेतली. सिमला बेणें पन्नास टक्के रोगट असतें, म्हणून शेतकऱ्यांना इटालियन बेणें मिळवून देण्यास सरकारनें मदत करावी अशी मागणी शेतकरी कार्यकर्त्यांनीं यावेळीं पुढें मांडली. तालुक्यांतील सहकारी चळवळीच्या प्रगतीबद्दल रिझर्व्ह बँकेच्या गव्हर्नरांनीं समाधान व्यक्त केलें.

**खाजगी मोटारींनीं रशिआचा प्रवास**—रशिआनें परदेशीय हौशी प्रवाशांना स्वतःच्या मोटारींतून प्रवास करण्याची परवानगी जाहीर केल्यापासून ब्रिटिश ऑटोमोबाइल असोसिएशनकडे २,००० भावी प्रवाशांनीं विचारणा केली आहे. रशिआंत जाणाऱ्या प्रवाशांनीं एका वेळीं २०० मैलांचा प्रवास करतां येईल इतका पेट्रोलचा किमान पुरवठा घ्यावा अशी सूचना त्यांना करण्यांत आली आहे.

**हिंदी पुस्तक-प्रकाशन संस्था**—मद्रास येथील दक्षिण भारत हिंदी प्रचार सभेनें हैदराबाद येथें हिंदी पुस्तकांचें प्रकाशन करणारी एक संस्था स्थापन करण्याचें ठरविलें आहे. दक्षिण भारतांत हिंदी भाषेचा प्रसार करण्यासाठी संस्था काढण्यांत येत आहे. पुस्तकें छापण्यासाठी १ लाख रुपये खर्चून एक छापखानाहि काढण्यांत येणार आहे.

**युरेनिअमच्या शोधाची धांवपळ**—अमेरिकन अणुशक्ती मंडळानें ५०० चौरस मैलांच्या नव्या भागांत युरेनिअमचा शोध करण्याची परवानगी खाजगी व्यक्तींना दिली आहे. नकाशे, ड्रिल्स व अणुद्रव्याचें अस्तित्व दाखविणारीं सूक्ष्म यंत्रें घेऊन, २,००० अमेरिकन नागरीक आपआपली भूमि आखून घेण्यासाठी कोलोरॅडो संस्थानांत जावयास निघाले आहेत.


# दि सांगली बँक लि.

## सांगली.

स्थापना १९१६ : शेड्यूल्ड बँक

| | |
|---|---|
| वसूल भांडवल | रु. ४,५०,००० |
| रिझर्व्हस् व इतर फंडस् | रु. ६,२५,००० |
| एकूण खेळतें भांडवल | रु. १,५०,००,००० |

: शाखा :

रबकवी, तेरदळ, कवठें महांकाळ, शिरहट्टी, विलिंग्डन कॉलेज, मंगळवेढा, शहापूर, उगार, इचलकरंजी, कराड, कोल्हापूर व मुंबई.

बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.

मॅनेजर.



# दि बेळगांव बँक लिमिटेड

(शेड्यूल्ड बँक)

गेलीं २७ वर्षें सतत प्रगतिपथावर असलेली व ठेवीदारांच्या वाढत्या विश्वासास पात्र असलेली बँक.

| | | |
|---|---|---|
| वसूल भांडवल | ... | रु. ६,००,००० |
| रिझर्व्ह व इतर फंड्स | ... | रु. १,८७,००० |
| ठेवी | ... | रु. १ कोटी १० लाखांचे वर |
| खेळतें भांडवल | ... | रु. १ कोटी ४० लाखांचे वर |

खालील वाढलेल्या दरानें ठेवी स्वीकारण्यांत येतात.

| | |
|---|---|
| १ व २ वर्षें मुदत | द. द. शें. ३ टक्के |
| ३ ,, ,, | ,, ३। ,, |
| ४ ,, ,, | ,, ३॥ ,, |
| ५ ,, ,, | ,, ४ ,, |
| सेव्हिंग्ज बँक | ,, २ ,, |
| होम सेव्हिंग्ज बँक | ,, २½ ,, |

याशिवाय दरमहा नियमित बचत करण्यासाठीं क्युम्युलेटिव्ह डिपॉझिटची आकर्षक योजना गेलीं ९ वर्षें सुरू असून ती चांगलीच लोकप्रिय झालेली आहे. या योजनेंत ३८ महिन्यांनंतर व्याजासह रक्कम परत मिळते.

दरसाल दर शेंकडा ४ टक्के दराची पंचवार्षिक कॅश-सर्टिफिकेटसहि दिलीं जातात.

बँकेच्या मुख्य कचेरीच्या इमारतींत अद्ययावत् सेफ डिपॉझिट व्हॉल्टची सोय आहे.

विशेष माहितीसाठीं समक्ष चौकशी करावी.

रविवार पेठ, बेळगांव.

एच. एस्. कुलकर्णी, मॅनेजर

# अर्थ

बुधवार, ता. ३१ जुलै, १९५७





संस्थापक : प्रो. वामन गोविंद काळे

संपादक : श्रीपाद वामन काळे


## परराष्ट्रीय हुंडणावळीची परिस्थिति बिकट कशी झाली

भारताची आयात वाढली आहे परंतु निर्यात त्यामानानें अपुरी पडते; त्याकारणानें परराष्ट्रीय व्यापारांत तूट येत आहे. आपलें ग्रेटब्रिटनमधील येणें कमी होत चाललें असून तें ह्यापेक्षा खाली जाणें धोक्याचें आहे. आपल्या चलनाचा आधार कमी होऊं न देणें जरूरीचें आहे. ह्यासाठी सरकारनें गेल्या कांहीं महिन्यांत आयातीवर कडक निर्बंध घालण्याचें धोरण स्वीकारलें आहे. ह्या प्रश्नाची पार्श्वभूमि नीट समजण्यास १९५६–५७ मध्यें परराष्ट्रीय देण्याची परिस्थिति कशी प्रतिकूल झाली, ह्याची माहिती उद्बोधक होईल.*

पहिल्या पंचवार्षिक योजनेच्या काळांत, परराष्ट्रीय देण्याघेण्यांतील चालू हिशेबांत दरसाल देण्यापेक्षा येणें जास्त निघत गेलें. १९५६-५७मध्यें ही परिस्थिति खूपच पालटली. चालू देण्या-घेण्यांत २९२·५ कोटी रुपयांची तूट आली आणि आपल्या परराष्ट्रीय शिलकींतून २१९ कोटी रुपये खर्चावे लागले. आयातीमधील, विशेषतः भांडवली मालाच्या आयातीमधील वाढ त्याला मुख्यतः कारणीभूत आहे. सरकारी उपक्रमांत ज्यास्त रक्कम गुंतविली गेली, त्यामुळें उत्पन्न झालेल्या आशादायक वातावरणामुळें खाजगी उपक्रमांतील गुंतवणूकहि वाढली. ह्याचा परिणाम म्हणजे, स्टर्लिंग शिलका ७४८ कोटी रु. वरून ५२९ कोटी रु. वर उतरल्या. इंटरनॅशनल मोनेटरी फंडाकडून ५५ कोटी रुपये मिळविण्यांत येऊन खर्चण्यांत आले, ते वेगळेच. ह्या संबंधांतील तपशीलवार तुलनात्मक आकडे पुढील पृष्ठावरील तक्त्यांत दिले आहेत.

१९५५–५६ मध्यें परराष्ट्रीय देण्या-घेण्यांत १७ कोटी रु. चा वाढावा उरला होता, तर १९५६–५७ मध्यें २९२·५ कोटी रु. ची तूट आली. १९५५–५६ च्या मानानें १९५६–५७ मध्यें निर्गत वाढली नाहीं; थोडी कमीच झाली; आयात मात्र ३२६ कोटी रु. नीं वाढली.

### आयातींत वाढ कां झाली ?

आयातींत एकाएकीं वाढ होण्याचीं कारणें खालीलप्रमाणें आहेतः—( १ ) खाजगी क्षेत्रांतील अपेक्षेपेक्षा मोठ्या औद्योगिक गुंतवणुकींत सरकारी क्षेत्रांतील खर्चांत भर; त्यांच्या एकत्र परिणामांचा योग्य वेळींच विचार झाला नाहीं. ( २ ) योजनेसाठी लागणाऱ्या आयातीच्या, विशेषतः लोखंड–पोलादाच्या आयातीचा, चुकीचा ( कमी ) अंदाज. ( ३ ) धान्याची मोठी आयात. ( ४ ) पूर्वी आयातीचे बाबतींत ठेवलेल्या दिलदार धोरणाचा साठून आलेला परिणाम.

आयातीमधील ३२६ कोटी रु. वाढीपैकी खासगी उपक्रमांच्या आयातीच्या वाढीचा वाटा १८४ कोटी रु. चा आहे. सरकारी आयातींत १४२ कोटी रु. वाढ झाली, त्यांत धान्याच्या आयातीस महत्त्वाचें स्थान आहे. १०२ कोटी रु. चें धान्य आयात झालें; वास्तविक खाजगी क्षेत्राच्या आयातींतील वाढींतहि त्याचा समावेश केला तरी चालण्याजोगा आहे. आयात मालाच्या किंमती वाढल्या म्हणून आयातीचा खर्च वाढलेला नाहीं; त्या किंमतींत वाढ फारच थोडी झालेली आहे; मालाची आयातच जास्त झाली आहे. निर्गतीच्या बाबतींत उलट झालें; निर्गत मालाच्या किंमतींत विशेष वाढ झाली, त्यामुळें प्रत्यक्ष मालाची निर्गत कमी होऊनहि निर्गतीचें उत्पन्न ज्यास्त घटलेलें नाहीं.

### देणग्या आणि अप्रत्यक्ष मिळकत

देणग्या ह्या सदराखाली झालेली मिळकत ४२ कोटी रु. वरून ३९·८ कोटी रु. वर उतरली. कोलंबो योजनेखालील मदत ५·४ कोटी रु. ची ४·९ कोटी रु. झाली. इंडो–अमेरिकन टेक्निकल को–ऑपरेशन कराराखाली मदत २·६ कोटी रु. नीं वाढून ती ३४·२ कोटी रु. झाली.

इतर अप्रत्यक्ष मिळकत बरीच जास्त, म्हणजे १०७ कोटी रु. झाली. गेल्या वर्षी ती ८४ कोटी रु. होती. हिंदी कंपन्यांचे आगबोट वहातुकीचें उत्पन्न वाढलें आणि परदेशी कंपन्यांनीं हिंदी बंदरांत माल चढवण्या–उतरण्याबद्दल जास्त पैसे दिले. अशाच प्रकारें भारताचाहि खर्च झालेला आहे, पण तो ह्या हिशेबांत आलेला नाहीं; त्यामुळें ह्यापोटीं झालेल्या मिळकतींतील वाढ खरी वाढ म्हणतां येणार नाहीं.

### हिंदी भांडवलाचें बहिर्गमन

खाजगी भांडवलाचें बहिर्गमन १९५६–५७ मध्यें जास्त झालें. १९५५–५६ मध्यें ५·१ कोटी रु. चें भांडवल परदेशीं गेलें; १९५६-५७ मध्यें त्याची रक्कम १७·२ कोटी रु. भरली. १९४८-४९ मध्यें २८·५ कोटी रु. हिंदी भांडवल बाहेर गेलें होतें; त्यानंतर एवढी मोठी भांडवली रक्कम कोणत्याच वर्षी परदेशांत रवाना झाली नव्हती.

### कर्जे व इतर तरतुदी

सरकारी क्षेत्रांत, सरकारी कर्जाचे पोटीं ५६·४ कोटी रु. आले. अल्प मुदतीचीं कर्जे उभारून परराष्ट्रीय हुंडणावळीची परिस्थिति आटोक्यांत ठेवावी लागली. त्यासाठी इं. मो. फंडाकडून ९५ कोटी रु. कर्जाची मंजुरी मिळविली, त्यांपैकी ६१ कोटी रु. प्रत्यक्ष वापरले. उरलेली रक्कम १२ जून, १९५७ रोजीं उचलण्यांत आली.

### सरकारी शिलकीचा वापर

चालू आणि भांडवली येण्या-देण्यांतील प्रतिकूल तफावत अशा रीतीनें २९२·५ कोटी रु. भरते. चूक-भूल त्यांत समाविष्ट केली, म्हणून एकूण तूट २९७·१ कोटी रु. होते. कर्जे व इतर भांडवली व्यवहार ह्यांपासून ७८·१ कोटी रु. मिळाल्यावरहि २१९ कोटी रु. ची तूट राहिलीच; ही भरून काढण्यासाठी सरकारच्या शिलकीचा वापर करावा लागला.

---

*रिझर्व्ह बँक : रिपोर्ट ऑन करन्सी अँड फायनान्स, १९५६–५७. किंमत रु. ४·५०.

## परराष्ट्रीय देण्या-घेण्याचा हिशेब

( कोटी रु. )

| | एप्रिल-जून १९५६ | जुलै-सप्टेंबर १९५६ | ऑक्टो.-डिसें. १९५६ | जाने.-मार्च १९५७ | १९५६-५७ एप्रिल-मार्च | १९५५-५६ एप्रिल-मार्च |
|---|---|---|---|---|---|---|
| १. आयात | | | | | | |
| ( अ ) खासगी | १९६·१ | १९५·५ | २०९·६ | १९४·७ | ७९५·९ | ६११·७ |
| ( ब ) सरकारी | ३४·१ | ५१·१ | ८४·४ | १११·० | २८०·६ | १३८·९ |
| एकूण | २३०·२ | २४६·६ | २९४·० | ३०५·७ | १,०७६·५ | १५०·६ |
| २. निर्गत | १५३·५ | १३४·८ | १७१·५ | १७७·२ | ६३७·० | ६४१·१ |
| ३. व्यापारांतील तफावत | −७६·७ | −१११·८ | −१२२·५ | −१२८·५ | −४३९·५ | −१०९·५ |
| ४. देणग्या | +९·६ | +८·३ | +७·६ | +१४·३ | +३९·८ | +४२·० |
| ५. इतर | +२२·६ | २२·१ | +३०·१ | +३२·४ | +१०७·२ | +८४·४ |
| ६. एकूण चालू देण्या-घेण्यांतील तफावत | −४४·५ | −८१·४ | −८४·८ | −८१·८ | −२९२·५ | १६·९ |
| ७. चूकभूल | −७·१ | +१७·७ | +२·२ | −१७·४ | ४·६ | −५·३ |
| ८. सरकारी कर्जें | +४·६ | +३·३ | +१०·९ | +३७·६ | +५६·४ | +६·५ |
| ९. इतर भांडवली देणीं-घेणीं | −१३·२ | −८·९ | −१५·६ | +५९·४ | +२१·७ | −३·१ |
| स्टर्लिंग शिलकांत वाढ (+) घट (−) | −६०·२ | −६९·३ | −८७·३ | −२·२ | −२१९·० | +१५·० |

### सरकारी मालकीचे धंदे तोट्यांत चालतात

मध्यप्रदेश सरकारचे उद्योगमंत्री श्री. तखतमल जैन ह्यांनीं राज्याच्या विधान सभेंत एका प्रश्नाला उत्तर देतांना अशी माहिती सांगितली कीं, सरकारच्या मालकीचे तीन कारखाने सध्यां तोट्यांत चालत आहेत. हे तीन कारखाने म्हणजे ग्वाल्हेर पॉटरीज, ग्वाल्हेर टॅनरी, आणि ग्वाल्हेर एंजिनिअरिंग वर्क्स, हे होत. ते म्हणाले कीं, एंजिनिअरिंग वर्क्स पूर्वीच्या ग्वाल्हेर राज्याच्या मालकीच्या रेल्वेचीं एंजिनें व मालवाहू डबे दुरुस्त करण्यासाठीं काढण्यांत आले होते. ही रेल्वे मध्यरेल्वेंत समाविष्ट करण्यांत आली आहे. परंतु मध्यरेल्वे ह्या कारखाना चालविण्यास तयार नाहीं. ग्वाल्हेर पॉटरीज ही कंपनी तोटयांत चालण्याचें मुख्य कारण म्हणजे, कारखान्यांतील यंत्रसामुग्री जुनीपुराणी झाल्यामुळें उत्पादनांत घट झालेली आहे. त्याशिवाय ह्या धंद्याच्या मालाच्या किंमती बाजारपेठेंत उतरल्या आहेत, आणि उत्पादनास लागणाऱ्या कच्च्या मालाची किंमत मात्र चढलेली आहे. औद्योगिक कोर्टानें दिलेल्या निर्णयास अनुसरून कारखान्याच्या कामगारांना पूर्वींपेक्षा दरसाल १,००,००० रु. अधिक द्यावे लागत आहेत. ह्या कारखान्याची सुधारणा व विस्तार करण्यासाठीं दुसऱ्या पंचवार्षिक कार्यक्रमांत ११ लाख, ६२ हजार रुपयांची तरतूद करण्यांत आली आहे. ही योजना १९५८-५९ ह्या वर्षी प्रत्यक्ष अंमलांत आणली जाईल असा अंदाज आहे. कारखान्याच्या जुन्या झालेल्या यंत्रसामुग्रीच्या ऐवजीं अगदीं नवीन प्रकारची व अद्यावत् पद्धतीची यंत्रसामुग्री बसविण्याचा सरकारचा विचार आहे. तोटयांत चालणारे हे सर्वच कारखाने व्यापारी पद्धतीनें चालविण्याचा सरकार विचार करीत आहे.

### शास्त्रीय शोधांची झेप आणि मानवी मन

आधुनिक यंत्रशास्त्रांत प्रगतीच्या शिखरावर असलेलीं अमेरिका-रशिआसारखीं राष्ट्रें ग्रहगोलांच्या सफरी करण्याचीं स्वप्नें रंगवीत आहेत. अणुशक्तीचा शोध लागल्यापासून तर अंतरिक्षांतून प्रवास करण्याची कल्पना अधिकच मूळ धरूं लागली आहे. पण असल्या शोधांचा मानवी मनावर काय परिणाम होईल त्याचा विचार फारसा कोणी करीत नाहीं. अमेरिकेच्या एका हवाई अधिकाऱ्यानें ह्या विषयासंबंधीं प्रकट केलेले विचार अंतरिक्षांतून परिभ्रमण करण्याच्या शक्यतेविषयीं निरुत्साह करणारेच आहेत. अंतरिक्षांतून प्रवास करण्यास समर्थ अशीं रॉकेट विमानें आर्थिक व तांत्रिक दृष्ट्या तयार झालीं तरी त्यांत बसणाऱ्या अगर तें चालविणाऱ्या माणसांचीं मन अकार्यक्षम होतात असें आढळून आलें आहे. हा लष्करी अधिकारी म्हणतो कीं, अंतरिक्षांतून प्रवास करणाऱ्या विमानांत असणाऱ्या माणसांना तीन गोष्टींना तोंड द्यावें लागेल. अशा प्रवासांत प्रकाशाचा किरणसुद्धां दिसणार नाहीं; पृथ्वीवरील गुरुत्वाकर्षणाची ओढ नाहींशी होईल आणि बाह्य जगाकडून कोठल्याहि प्रकारची माहिती अगर मार्गदर्शन मिळणार नाहीं. ह्या विलक्षण परिस्थितींत कांहीं थोड्या तासांच्या अवधींतच माणसाचें मन निराधार होऊन शून्याप्रत जाईल आणि भावना व अंतःप्रेरणा ह्या प्रबल होतील. ह्यासंबंधीं जे प्रयोग करण्यांत आले आहेत त्यावरून असें दिसून आलें आहे कीं वर दिलेल्या परिस्थितींत माणसाला नाना प्रकारचे भ्रम होऊं लागतात. डोळ्यांपुढें काजवे चमकतात अगर प्रकाश-रेषा दिसतात. कांहीं वेळीं भूमितीमधील आकृतीहि दिसतात. इतकेंच नव्हे तर प्रयोगानंतर कित्येक तास असेच भ्रम चालूं राहतात.

तमाम दंतरोगांवर

★ माकडछाप म्हणजेच काळी टूथ पावडर ★

## दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत बँकांची कामगिरी

**श्री. गोविंदराव सराफ, बी. ए., एलएल. बी., ह्यांचें बेळगांव रोटरी क्लबांत १९ जुलै रोजीं झालेलें भाषण.**

देशाच्या अर्थव्यवस्थेंत बँका संजीवन देण्याचें कार्य करीत असतात. कोणत्याहि राष्ट्राची शक्ति त्यांतील बँकांच्या मजबुतीवर अवलंबून असते. बँकांचें महत्त्व त्यांच्या पत वाढविण्याच्या सामर्थ्यांत आहे. समाजाच्या प्रगतीबरोबर त्याची पतहि वाढत असते.

नियोजनाच्या अर्थव्यवस्थेंत बँकांना फार महत्त्वाची कामगिरी करावयाची असते. भारतासारख्या अविकसित देशाची प्रगति शीघ्रगतीनें करावयाची ठरल्यावर त्यासाठी तुटीच्या अर्थसंकल्पाचा ( Deficit finance ) अवलंब करणें क्रमप्राप्तच होतें. ही पद्धत जगास कांहीं नवीन नाहीं; मात्र ती कोणत्या कारणासाठी उपयोगांत आणिली जाते त्याला महत्त्व आहे. युद्धकाळांतील तुटीच्या अर्थसंकल्पांत संहाराचीं बीजें असतात तर शांततेच्या काळांत याचा अवलंब विकास योजनासाठी केल्यास त्यामुळें समाजाचे सुखसंवर्धनास मदत होऊन अचंबा वाटण्याइतकी प्रगति साधतां येते. अमेरिकेनें आपल्या 'न्यू डील' कार्यक्रमानें, तसेंच रशियांतील पंचवार्षिक योजनांमुळें त्या देशांनीं औद्योगिक प्रगतींत क्रांती घडवून आणल्याचें स्पष्ट दिसून येतें.

अशा प्रकारच्या अर्थव्यवस्थेंत देशाच्या मध्यवर्ती बँकेस चलनवाढीमुळें होणाऱ्या संभाव्य दुष्परिणामास आळा घालण्यासाठी वेळोवेळीं जरूर ती निर्बंधांची उपाय-योजना करण्यासाठी धैर्यानें व दूर दृष्टीनें आंखणी करावयाची असते. समाजांतील विविध वर्गांतील वाढत्या क्रयशक्तींतून विकास योजनांना पैसा परत मिळण्यासाठी कर्जांची व बचत योजनांची उभारणी करून एकंदरींत अर्थव्यवस्था मजबूत व प्रगतीपथावर रहाण्याबद्दल जागरूक रहावें लागतें. व्यापारी बँकांना रिझर्व बँकेकडून गिऱ्हाइकांना कर्जे देण्याबाबत, तसेंच कर्जरोखे व बचत योजना, यांच्या व औद्योगिक विकासासाठी मर्यादित मदत इत्यादिबाबत जें धोरण व उपाय अवलंबिले जातील, ते कटाक्षानें पार पाडण्यासाठी मनःपूर्वक सहकार्य देण्याची जबाबदारी पत्करावी लागते. याचबरोबर, या बँकांना देशाच्या मागासलेल्या भागांत शाखा विस्तार करून, समाजांत बँकिंगविषयीं आवड उत्पन्न करून, जनतेकडील बचतीची संवय वाढीस लावून, तिच्या हातांत खेळणाऱ्या जादा रकमेचा ओघ विकास योजनासाठी लावण्याची महत्त्वाची कामगिरी बजावणेची असते.

दुसऱ्या पंचवार्षिक योजनेंत मुख्य भर औद्योगिक उत्पादन वाढविण्याकरितां मूलभूत धंद्यांचा विकास करून रोजगारीस वाढता वाव मिळण्यांत राहणार असून समाजांतील विषमता कमी करण्याचे दृष्टीनें पावलें टाकणेंची आहेत. योजनेची फलश्रुति म्हणजे या पांच वर्षांत एक कोटींना नवे रोजगार मिळून राष्ट्रीय उत्पन्नांत सवाईनें वाढ व्हावी असा अंदाज आहे. सार्वजनिक कक्षेंतील कार्यक्रमासाठी ४८०० कोटी रु. व खासगी कक्षेकरता २४०० कोटी रु. ची अशी एकूण गुंतवणूक ७२०० कोटी रु. ची यासाठी करण्यांत यावयाची आहे. यांपैकी पहिल्या विभागांत सरकार जें ७०० कोटी रुपयांचें कर्ज उभारणार आहे त्यांतील कांहीं भाग बँकांना घ्यावा लागणार असून ५०० कोटींच्या अल्प बचतीच्या कार्यक्रमासाठी अप्रत्यक्ष रीत्या जनतेकडून पुरवठा करविणेचा आहे. खासगी कक्षेंतील कार्यक्रमांसाठी मात्र बँकांनीं विशेष कामगिरी पार पाडणेची आहे. यांपैकी ग्रामीण विभागांतील शेतीच्या व लहान आणि घरगुती उद्योगधंद्यांसाठी कर्जपुरवठ्याची सोय नुकतेंच इंपीरियल बँकेचें राष्ट्रीयकरण करून स्थापलेल्या स्टेट बँकेकडून व्हावयाची आहे. यासाठी या बँकेस नजिकच्या काळांत या विभागांत एकूण ४०० नवीन शाखा काढणें जरूर असून, सहकारी सोसायट्यांच्या मध्यस्थीनें शेतीसाठी, वगैरे कर्जपुरवठा व्हावयाचा आहे. लहान उद्योगधंद्यांसाठी या बँकेकडून एक चांचणीचा उपक्रम सुरू करण्यांत आला असून त्याच्या अनुभवावरून पुढील योजना व्यापक दृष्टीनें व्हावयाची आहे. आतांपर्यंत आमच्या देशांतील बँकांनीं शहरी विभागांतच गर्दी केल्यामुळें ग्रामीण विभाग, अर्थात् देशाचा गाभा, हा शुष्कच राहिला. त्या विभागाचे आर्थिक दृष्ट्या पुनरुज्जिवन झाल्याशिवाय देशाची खरी उन्नति होणार नाहीं, व शेतीचें उत्पादन वाढल्याशिवाय उद्योगधंद्यांची प्रगतीहि टिकणार नसल्यानें, स्टेट बँकेमार्फत होत असलेल्या या उपक्रमास फार महत्त्व आहे व त्याच्या प्रगतीकडे तज्ज्ञांचें लक्ष लागून राहिल्यास नवल नाहीं. शेतीच्या उत्पादनाबरोबर शेतमालाची साठवणी, सफाई ( Processing ) व विक्री करण्यासाठींहि कर्जपुरवठा होणेचा असल्यानें वखारींची सोय वखार बोर्डाकडून होईल त्याप्रमाणें स्टेट बँक व तिच्या मागोमाग इतर व्यापारी बँकांनाहि या विभागांत आपलें जाळें पसरण्यास सोयीचें होणार आहे.

उद्योगधंद्यांच्या उभारणीसाठीं, दीर्घ मुदतीच्या भांडवलाची सोय बँकांकडून होणें शक्य नाहीं. कारण, आपल्या बँकांच्या ठेवी बहुंशीं, म्हणजे ६५%, अल्प मुदतीच्या असतात. तरी चांगल्या खात्रीच्या कंपन्यांच्या शेअर्स व डिबेंचर्समध्यें बँका थोड्या प्रमाणांत गुंतवणूक करीत असतात. मात्र, चांगल्या सुव्यवस्थित व वजनदार औद्योगिक कंपन्यांच्या अद्यावत्करणाच्या व विकासाच्या, तशाच इतर तात्पुरत्या गरजा भागविण्याची कामगिरी व्यापारी बँका बजावूं लागल्या आहेत, हें नमूद करणें अगत्याचें आहे. वास्तविक आमचें बँकिंग ब्रिटिश पद्धतीवर चालवीत आणल्यामुळें अशा प्रकारचीं औद्योगिक कर्जे देणें हें मान्य पद्धतीस सोडून आहे. कारण यामुळें बँकांना आपली जिंदगी तरती ( Liquid ) ठेवणें कठीण जाते. जपान, पश्चिम जर्मनी व अमेरिकेंतहि बँकांनीं अशी सोय केल्यामुळेंच तेथील उद्योगधंद्यांचा विकास होऊं शकला. परंतु त्या देशांतील मध्यवर्ती बँकांकडून अशा प्रकारच्या औद्योगिक कर्जांच्या तारणावर पुनः पैसा उभारतां येण्याची सोय होते. येथें रिझर्व्ह बँकेकडून अशा प्रकारची तरतूद होत नसल्यामुळें केवळ आपल्या जुन्या गिऱ्हाइकांची सोय पाहण्याचे व मुख्यतः देशांतील बदलत्या परिस्थितीकडे लक्ष देऊन प्रगतीस मदत करण्याचे सद्भावनेनें बँकांनीं दिलेलीं कर्जे नेहमींप्रमाणें परत न फिरल्यामुळें बँकांवर फारच तीव्र ताण पडत आहे. यंदाच्या हंगामांत बँकांनीं आपल्याकडील ठेवींच्या ८०% पर्यंत कर्जे पुरविलीं याचें कारण मुख्यतः औद्योगिक बाबींकडे दिलेलीं कर्जे तशींच अडकून राहिलीं व ठेवींमध्यें अपेक्षित वाढहि दिसून येत नाहीं हें होय. या कुचंबणेंतून मार्ग काढण्याचे दृष्टीनें लवकरच रीफिनान्स कॉर्पोरेशनची स्थापना होत असून तिच्या मार्फत बँकांना अशा कर्जांचे तारणावर रकमा मिळूं लागतील हें सुचिन्ह होय. बँकांच्या ठेवींचें अल्प मुदतीचें स्वरूप लक्षांत घेऊन आतांपर्यंत इंडस्ट्रियल फिनॅन्स कॉर्पोरेशन, स्टेट फिनॅन्स कॉर्पोरेशन व तत्सम संस्था औद्योगिक विकासासाठी भांडवल व कर्जपुरवठ्याचे दृष्टीनें उभारण्यांत आल्या आहेत हें सर्वांस ठाऊकच आहे. परंतु या

कार्पोरेशन्सनांहि आतां अनुभवांती ही कामगिरी पुनः बँकांच्या मध्यस्थीनें करवावी असें वाटत आहे. यावरून बँकांची कार्यक्षमता व महत्त्व समजून येतें. उद्योगधंद्यांच्या तात्पुरत्या' गरजा मात्र बँका पहिल्यापासूनच भागवीत आहेत.

याखेरीज व्यापारी बँकांकडून पंचवार्षिक योजनेंतील कामें घेणाऱ्या कंत्राटदार कंपन्यांच्या दैनंदिन गरजा पुरविण्याची कामगिरी उत्तम प्रकारें होत आहे. त्यांच्या कामाच्या जागीं बँकेच्या शाखा ठेवून त्यांना लागणारा पैसा पुरविणें, त्यांचीं सरकारीं बिलें डिस्कौंट करणें, इत्यादि निकडीच्या कामीं वेळेवर बँका सोय करीत असल्यामुळें त्यांच्या कामाचा गाडा अविरतपणें चालू राहण्यास मदत होत आहे.

अशा प्रकारें, बदलत्या परिस्थितींत प्रगतीस खीळ न पडण्याचे हेतूनेंच बँका कांहीं धोका पत्करून व झीज सोसूनहि पंचवार्षिक योजनेस शक्य तों हातभार लावीत आहेत. सरकार व रिझर्व बँकेकडून मात्र त्यांना उत्तेजन मिळण्यापेक्षा नवीन नवीन निर्बंधांचे जाच सहन करावे लागत आहेत. नवीन कंपनी कायदा व रिझर्व बँक कायद्याची दुरुस्ती यामुळें नव्या नव्या उद्वेगकारक अडचणी त्यांच्यापुढें येत आहेत. तरी केवळ सेवाभावानें प्रेरित होऊन बँकांनीं आपलें कार्य नेटानें चालविलें आहे. बँकांनीं त्यांच्याविषयींच्या अपेक्षा पार पाडणें हें सर्वस्वीं त्यांच्याकडील ठेवींत वाढ होण्यावर अवलंबून राहणार आहे व यासाठी सरकारकडून योजिलेला गुंतवणुकीचा व खर्चाचा कार्यक्रम पार पडणें व समाजामध्यें सर्वत्र बँकिंगची संवय वाढती राहणें अत्यावश्यक आहे.

---

### १९५६-५७ मध्यें टांकसाळींनीं पाडलेले नये पैसे

१ एप्रिल, १९५७ पासून दशमान नाणीं सुरू झालीं. त्यासाठी लागणारीं नाणीं पाडण्यांत हिंदी टांकसाळी १९५६-५७ मध्यें गुंतलेल्या होत्या. ह्या वर्षी १, २, ५ आणि १० नव्या पैशांची एकूण ७४ कोटी, ४० लक्ष नाणीं पाडण्यांत आलीं, त्यांची किंमत २·५ कोटी रु. होती. ह्या नव्या नाण्यांचा तपशील खालीं दिला आहे :--

'००० वगळले आहेत

| | मद्रास टांकसाळ | हैद्राबाद टांकसाळ | अलिपूर टांकसाळ | एकूण संख्या | एकूण किंमत (रु.) |
|---|---|---|---|---|---|
| १० नये पैसे | ७,०६,२० | — | ७,१६,०५ | १४,२२,२५ | १,४२,२२ |
| ५ नये पैसे | ४,४२,७० | — | ४,५३,२५ | ८,९५,९५ | ४४,८० |
| २ नये पैसे | ६,३०,७० | — | ७,४४,७० | १३,७५,४० | २७,५१ |
| १ नया पैसा | १६,४९,३० | ८,४९,७० | १२,४८,७० | ३७,४७,७० | ३७,४८ |
| एकूण | ३४,२८,९० | ८,४९,७० | ३१,६२,७० | ७४,४१,३० | २,५२,०१ |

---

### नॅशनल केमिकल लॅबोरेटरीचे पहिले हिंदी डायरेक्टर

मुंबई विद्यापीठाच्या केमिकल टेक्नॉलजी खात्याचे डायरेक्टर डॉ. वेंकटरामन्, ह्यांची १ ऑगस्टपासून पुण्याच्या नॅशनल केमिकल लॅबोरेटरीच्या डायरेक्टरचे जागीं नेमणूक झाली आहे. लॅबोरेटरीचे पहिले डायरेक्टर प्रो. मॅकबेन व दुसरे डायरेक्टर प्रो. फिंच हे होते.

### आयुर्विमा पॉलिसींच्या अटी सैल केल्या

आयुर्विमा पॉलिसी हा एक कायदेशीर करार असतो. ह्या कराराच्या अटी विमेदाराला पाळाव्या लागतात. भारत सरकारनें हा धंदा आतां आपल्या मालकीचा केला असला तरी पूर्वी अनेक आयुर्विमा कंपन्यांनीं आपआपल्या विमेदारांना पॉलिसी दिलेल्या होत्या. ह्या विमापत्रकांत विमेदारांवर घालण्यांत आलेल्या कांहीं अटी बऱ्याच कडक असत. खाजगी मालकीच्या कंपन्यांना अशा प्रकारच्या अटी घालणें जोखमीच्या दृष्टीनें कदाचित् आवश्यकहि वाटलें असेल. पण, आतां सरकारी आयुर्विमा कॉर्पोरेशननें अशा प्रकारचे अनेक नियम व अटी सैल केल्या आहेत. नवा धंदा मोठ्या प्रमाणावर मिळविण्यासाठी नवीन धोरण स्वीकारलें असण्याचा संभव आहे. अटींबाबत ज्या सवलती देण्यांत येणार आहेत, त्यांपैकी बहुतेक पुढें दिल्या जाणाऱ्या विमापत्रकांना तर लागू होतीलच; पण जीं पूर्वींचीं विमापत्रकें चालू असतील त्यांनाहि त्यांचा फायदा मिळेल. नव्या नियमांप्रमाणें निरक्षर लोकांनाहि आपल्या आयुष्याचा विमा उतरवितां येईल. ह्यापूर्वी कांहीं अपवाद सोडून निरक्षर लोकांना येत नसे. ज्या विमेदारांनीं हयातीनंतरचे विमे घेतलेले असतील त्यांना उतारवयांत एक सवलत देण्यांत येणार आहे. अशा विमेदारांना वयाचीं ८० वर्षे पूर्ण झाल्यावर अगर पॉलिसी घेतल्यापासून ३५ वर्षे पूर्ण झाल्यावर विम्याचे हप्ते भरावे लागणार नाहींत. ह्या दोन्हींपैकी जी तारीख उशिराची असेल त्या तारखेपासून वरील सवलत मिळेल. स्त्रियांच्या विम्यावर पूर्वी घालण्यांत आलेले कांहीं कडक निर्बंध आणि घेतला जाणारा जादा हप्ता ह्यांच्या बाबतींतहि सवलत देण्यांत आली आहे.


## भारत सरकारचें नवें कर्ज

### ३¾% दराचे नॅशनल प्लॅन बाँड्स् चौथी सीरीझ्
### (३¾% दराचे १९६७ सालचे)

**विक्रीची किंमत: प्रत्येकी रु. १०० दर्शनी (नॉमिनल) किंमतीच्या बाँडला रु. ९९·५०**

**परतफेडीची तारीख १ ऑगस्ट १९६७**

### ४% दराचे १९७२ चे कर्जरोखे (लोन)

**विक्रीची किंमत: प्रत्येकी रु. १०० दर्शनी (नॉमिनल) किंमतीच्या रोख्याला रु. १००**

**परतफेडीची तारीख १ ऑगस्ट १९७२**

वरील बाँड्स् व कर्जरोख्यांच्या खरेदीसाठी करावयाचा भरणा एकाच वेळीं स्वीकारण्यांत येईल व अंदाजे शंभर कोटि रुपये रकमेइतक्या किंमतीचे बाँड्स् व कर्जरोखे यांची विक्री करण्यांत येईल.

वरीलसाठी करावयाचा भरणा (१) रोखीनें, चेकनें अगर (२) १९५७ चें ३ टक्के दराचें व्हिक्टरी लोन कर्जरोखे अगर १९५८ चें ३ टक्के दराचें लोन कर्जरोखे ह्या स्वरूपांत स्वीकारण्यांत येईल.

नवीन बाँड्स् व कर्जरोखे यांवर १ ऑगस्ट १९५७ पासून व्याज चालू होईल व तें दर सहामाहीस १ ऑगस्ट व १ फेब्रुवारी रोजीं देण्यांत येईल.

कर्जासाठी भरणा रकमा स्वीकारण्यास ५ ऑगस्ट १९५७ पासून सुरुवात होऊन ८ ऑगस्ट रोजीं किंवा तत्पूर्वीहि आगाऊ जाहीर न करतां त्या स्वीकारणें बंद करण्यांत येईल.

## इंग्लिश खाडीखालून बोगद्याचा मार्ग

ब्रिटन व फ्रान्स ह्यांना जोडणारा भुयारी मार्ग इंग्लिश खाडीच्या खालून काढण्याची कल्पना बरींच जुनी आहे. ही कल्पना एका फ्रेंच एंजिनिअरनें प्रथम नेपोलिअन बोनापार्टला सुचविली होती. त्यानंतर उभयतां देशांतील एंजिनिअर्स व राजकारणी ह्यांनीं तिचा अधूनमधून विचार केलेला आढळतो. पण प्रत्यक्ष कार्याच्या दृष्टीनें मात्र कांहींच करण्यांत आलें नाहीं. आतां ह्या कल्पनेकडे कांहीं लोक पुन्हां लक्ष देऊं लागले आहेत. आजवरच्या अनुभवावरून फारसें कांहीं होणार नाहीं अशी शंका व्यक्त करण्यांत येत आहे. पण ह्या कल्पनेकडे लक्ष देणारी आजची मंडळी भुयारी मार्ग बांधण्याच्या कामीं निश्चयानें पुढचीं पावलें टाकीत आहेत.

बोगदा बांधावयाचा झाल्यास त्याकामीं जी स्थापत्यविषयक, भूस्तरविषयक, अर्थशास्त्रीय आणि राजकीय पहाणी करावी लागेल तिचा श्रीगणेशा लवकरच सुरू होणार आहे. पहाणीचा अहवाल जर अनुकूल ठरला तर ब्रिटिश व फ्रेंच सरकारांचा पाठिंबा मिळवून कामास सुरवात करण्यांत येणार आहे. ह्या कामांत युनिव्हर्सल सुएझ कॅनॉल कंपनी, ब्रिटिश चॅनेल टनेल कंपनी, कांहीं फ्रेंच वहातूक कंपन्या व अमेरिकन कंपन्या लक्ष घालीत आहेत. पहिली कंपनी बोगद्याच्या कामासाठीं लागणारें तंत्रज्ञ पुरविणार आहे. परवांपर्यंत सुएझचा कालवा तीच कंपनी चालवीत होती. त्यामुळें तिला असल्या कामाचा चांगला अनुभव आहे. इजिप्तशीं चाललेल्या देण्याघेण्याच्या वाटाघाटी संपल्या म्हणजे ह्या कंपनीजवळ बरेंचसें भांडवल गुंतविण्यासाठीं मोकळें राहील. बोगद्यासाठीं १० कोटी पौंड अथवा २८ कोटी डॉलर्स भांडवल लागेल असा अंदाज आहे. त्यामुळें अमेरिकन भांडवलाच्या गुंतवणुकीचें ब्रिटन व फ्रान्समध्यें स्वागतच करण्यांत येत आहे.

बोगद्याच्या योजनेसाठीं अनुकूल असें आंतरराष्ट्रीय वातावरणहि अलीकडे निर्माण झालें आहे. युरोपचें राजकीय व आर्थिक एकीकरण साधण्याची कल्पना मूळ धरूं लागली आहे. तेव्हां ब्रिटन व फ्रान्स ह्यांना जोडणारा बोगदा बांधणें तर्कशुद्धच ठरेल. बोगद्याचें स्वरूप कसें असेल आणि त्यासाठीं लागणारें भांडवल कशा रीतीनें उभारावें लागेल ह्याविषयीं अहवाल तयार झाल्याशिवाय कांहींच सांगतां येणार नाहीं. परंतु ब्रिटिश चॅनेल कंपनीनें बोगद्याचें जें चित्र रेखाटलें आहे त्यांत रेल्वेगाड्या जाण्याचे दोन मार्ग असावे; त्यांचा व्यास १७ फूट असावा व लांबी सुमारें ३० मैल असावी, असें दृश्य आहे. बोगदे डोव्हरपासून निघून कॅलेजवळ फ्रेंच भूमिला मिळतील. कंपनीच्या मतानें इतक्या लांबीचा मोटारीचा भुयारी रस्ता बांधणें फारच अवघड आहे. कारण, अशा रस्त्यांत शुद्ध हवेचा सतत पुरवठा करावा लागेल आणि तसें करणें फारच कठीण आहे. तथापि, रेल्वेरस्त्याबरोबरच असा मोटारींचा रस्ता तयार करणें कितपत शक्य आहे त्याचा व्यवहार्य दृष्टीनें अभ्यास करण्याला तपासणीदारांना सांगण्यांत येणार आहे.

---

**मीठ आहे, पण वाघिणी नाहींत**—सौराष्ट्रांतील निरनिराळ्या मिठागारांतून चालू वर्षी मागील वर्षापेक्षाहि अधिक मीठ निर्माण करण्यांत आलें. सुमारें २५,००० टन मीठ ठिकठिकाणीं पडून आहे. पण तें मागणी असणाऱ्या ठिकाणीं वाहून नेण्यास पुरेशा रेल्वे वाघिणी मिळत नाहींत, अशी मिठागारांच्या मालकांची तक्रार आहे. सौराष्ट्रांत सुमारें ३० मिठागरें आहेत.


५० वर्षांपेक्षा जास्त जनतेची सेवा करीत असलेलें मुंबईतील एक प्रसिद्ध निवासस्थान

★ सरदारगृह ★

प्रत्येक खोलींत स्वतंत्र बाथरूम व बाल्कनी
लग्नमुंजी वगैरे कार्यांची व भोजनपार्टींची कमी खर्चांत मनपसंत व्यवस्था
सभासंमेलनें यांची टिळक हॉलमध्यें सोय.
क्रॉफर्ड मार्केटजवळ, मुंबई २.

कण आणि क्षण
( सुखी जीवनाच्या पाऊलवाटा )
लेखक: –श्री. वा. काळे, संपादक, "अर्थ"
मराठी दुसरी आवृत्ति ] [ किं. १ रु. ८ आ.

अन्नाचें रहस्य




बेडेकर मसाले, लोणचीं, पापड
ह्या वस्तूंनीं आपल्या जेवणांत गोडी वाढते व समाधान वाटतें.
★ व्ही. पी. बेडेकर आणि सन्स लि. ★
दुकानें—गुरुभाट, ठाकुरद्वार, दादर, कोट, परळ
— द. ना. हेजीब, ७० शुक्रवार पेठ, पुणें —



## हिंदी कापडाची वाढती निर्यात

१९५६ च्या पहिल्या चार महिन्यांशीं तुलना करतां १९५७ च्या पहिल्या चार महिन्यांत भारतांतून निर्यात झालेल्या गिरणी कापडाचें प्रमाण सुमारें ३४ टक्क्यांनीं वाढलें आहे. जानेवारी ते एप्रिल, १९५७ पर्यंत एकूण ३३.९ कोटी वार कापडाची निर्यात झाली.

१९५५ शीं तुलना करतां १९५६ मधील निर्यातींत घट झाली होती; त्याउलट परिस्थिति आतां निर्माण झाल्याचें या आंकड्यांवरून दिसून येतें. १९५६ ची निर्यात १९५५ पेक्षा ९ टक्क्यांनीं कमी, म्हणजे ५४.४ कोटी वार होती.

१९५५ मध्यें अशा प्रकारें गिरणी कापडाच्या निर्यातींत घट होऊनहि जागतिक गिरणी कापड व्यापारांत भारताचा दुसरा क्रमांक कायम राहिला. या मालाच्या जागतिक व्यापारांत सदर वर्षांत एकूण ५ टक्के घट झाली होती.

गिरणी कापडाच्या निर्यातींत वाढ करण्यासाठीं भारत सरकारनें अनेक उपाय योजले आहेत. कापडावरील नियात कर रद्द करण्यांत आला, त्याचप्रमाणें कापसाच्या आयातीवरील जकातहि रद्द करण्यांत आली. तुकडे कापडाच्या नियातास सढळ परवाने देण्यांत येतात.

ऑक्टोबर, १९५४ मध्यें गिरणी कापडाच्या निर्यातींत वाढ करणाऱ्या एका मंडळाची स्थापना करण्यांत आली आहे. यासाठी या मंडळानें रंगून, सिंगापूर, लाओस, मोंबासा, बगदाद व एडन या ठिकाणीं आपल्या कचेऱ्या स्थापिल्या आहेत.

त्याचप्रमाणें परदेशांतील बाजारपेठांतील परिस्थितीचा अभ्यास करण्यासाठी व तेथील आयातदारांशीं संबंध प्रस्थापित करण्याकरितां शिष्टमंडळें पाठविण्यांत आलीं. परदेशांतील आयातदारांस चांगल्या दर्जाचा माल पाठविण्यासाठी तो रवाना करण्यापूर्वी तपासणी करण्यांत येते. परदेशांत भारतीय माल लोकप्रिय करण्यासाठी अनेक ठिकाणीं प्रदर्शनें इत्यादि भरविण्यांत आलीं. तसेंच अनेक देशांशीं करण्यांत आलेल्या व्यापार करारांमुळेंहि निर्यातींत वाढ झाली आहे.

### हातमागी कापडाची निर्यात

१९५६ मध्यें ५.९८ कोटी वार हातमागी कापडाची निर्यात झाली. १९५५ चा हाच आंकडा ५.५८ कोटी वार होता. हातमागी कापडाच्या निर्यातींत वाढ करण्यासाठी कोलंबो, एडन, बँकॉक व कुआलालंपूर येथें विक्री केंद्रें उघडण्यांत आलीं आहेत. निर्यातीसाठीं तयार केलेल्या हातमागी कापडावर सहकारी संस्थांना दर रुपयामागें ६ नये पैसे रिबेट देण्यांत येतो. परदेशांतील प्रमुख शहरीं प्रदर्शनांत व व्यापार केंद्रांवर हातमागी माल ठेवण्यांत येतो.

उत्तर अमेरिकेंत भारतीय हातमागी कापडाच्या निर्यातींत वाढ करण्यावर उपाय सुचविण्यासाठीं भारत सरकारनें अमेरिकन तज्ज्ञांची एक तुकडी बोलाविली आहे.

हातमागी कापडाच्या निर्यातींत वाढ करण्यासाठीं एक निर्यात वाढ मंडळ नेमण्याचेंहि भारत सरकारनें नुकतेंच ठरविलें आहे.


# भोर स्टेट बँक लि.

[ स्थापना : १९४४ ]

**मुख्य कचेरी:—भोर, जि. पुणें.**

**शाखा:—पुणें, पाली व शिरवळ.**

| | |
|---|---|
| अधिकृत भांडवल | रु. ५,००,००० |
| खपलेलें भांडवल | रु. ५,००,००० |
| वसूल भांडवल | रु. २,५०,००० |
| गंगाजळी व इतर फंडस् | रु. ८१,००० |

**बोर्ड ऑफ डायरेक्टर्स**

श्री. म. व्यं. शिंगरे, अध्यक्ष. — म. भू. ना. पां. थोपटे, उपाध्यक्ष.
रावसाहेब य. द. खोले. — श्री. चं. रा. राठी.
श्री. गो. वा. देवी — श्री. बा. म. चंदुके.

सरकारी रोखे खरेदी—विक्री, व्याजवसुली, पेन्शन कलेक्शन व इतर बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.
बँक १ ते ४ वर्षे मुदतीसाठीं कायम ठेवी स्वीकारते.
दराबाबत समक्ष चौकशी करावी.
पुणें कचेरी:—बुधवार घ. नं. ३६१–६२, पासोड्या विठोबाजवळ. फोन नं. २५७६.
अधिक माहितीसाठीं लिहा.

वाय. एस. जोशी
मॅनेजर.

स्थापना सन १९३५ — टे. नं. २६२५१८

# दि मराठा मार्केट पीपल्स को-ऑपरेटिव्ह बँक लि.

सिताराम बिल्डिंग, कॉफर्ड मार्केट, मुंबई नं. १
( १९२५ च्या सहकारी कायद्यान्वयें रजिस्टर झालेली )

| | |
|---|---|
| संकल्पित भांडवल | रु. १,००,००० |
| जमा भांडवल | रु. ९१,००० |
| फंडस् (रिझर्व्ह व इतर) | रु. ९०,०००हून अधिक |
| ठेवी | रु. ६,००,००० ,, |
| खेळतें भांडवल | रु. ९,००,००० ,, |

★ बोर्ड ऑफ डायरेक्टर्स ★

श्री. भगवंतराव नामदेवराव ढोबळे, (अध्यक्ष)
श्री. गेनुभाऊ गोविंदराव ढोले, ( उपाध्यक्ष )
श्री. उमाकांत भाऊराव तांबे, ( ऑ. मॅ. डायरेक्टर )
श्री. मल्हारराव बाबुराव बेंडे, ( ऑ. ट्रेझरर )
श्री. आनंदराव पांडुजी ढोरे — सभासद
श्री. मळीबुवा मार्तंड वामन ,,
श्री. गेनुजी लक्ष्मण नलवडे ,,
श्री. ज्ञानेश मारुतीराव मनसुख ,,
श्री. मनोहर रामजी नेहरकर ,,

सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.


हें पत्र पुणें पेठ शिवाजीनगर घ. नं. ११५।१ आर्यभूषण छापखान्यांत केशव गणेश शारंगपाणी यांनीं छापिलें व श्रीपाद वामन काळे, बी. ए., यांनीं 'दुर्गाधिवास' ८२३ शिवाजीनगर ( पो. ऑ. डेक्कन जिमखाना ) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.